॥ श्रीनवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 14 — CHATURDASHODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

Despite achieving personal immortality, Mainavati is consumed by grief whenever she looks at her son, Gopichand, recognizing that the inescapable jaws of death will eventually devour his youthful radiance just as they did his late father. Seeing her tears fall upon him during his morning bath, Gopichand promises to violently avenge whatever earthly wrong has caused her sorrow. Mainavati responds by angrily pointing out how he materialistically spoils his wife while leaving his mother to live like a poor servant. She warns him that the tiger of death is always waiting to strike, and the only way to escape this certain destruction is to leave his worldly pleasures behind and seek initiation under Jaalindharnath.

Intrigued, the king asks for twelve years to enjoy his earthly realm first, but his mother fiercely warns him that life is as fleeting as a water bubble and commands immediate action. Overhearing this exchange, the chief queen Lumavanti views the path of yoga as absolute ruin and orchestrates a malicious conspiracy among the queens, falsely convincing Gopichand that his mother is infatuated with Jaalindharnath and seeks to usurp the throne. Blind with rage, Gopichand orders his servants to throw Jaalindharnath into a deep pit and bury him alive beneath a mountain of horse dung. Unshaken by this betrayal, the master—who had foreseen the entire conspiracy—simply locks himself into the adamantine posture, unleashing powerful protective weapons that hold the suffocating debris harmlessly suspended over his head.

Ovee 1

जयजयाजी पंढरीनाथा । समचरणीं भक्ततापशमिता । कटीं कर नासाग्रीं दृष्टी ठेविता । होसी रंजिता मुनिमानसा ॥

Transliteration

Jaya-jaya-ji Pandharee-Naathaa | Sama-charanee bhakta-taapa-shamitaa | Katee kara naasaagree drishtee thevitaa | Hosee ranjitaa muni-maanasaa ||

Ovee 2

ऐसा स्वामी तूं करुणाकर । तरी तूं बोलवीं भक्तिसार । मागिले अध्यायीं कथानुसार । परम कृपें वदविला ॥

Transliteration

Aisaa svaamee too karunaa-karu | Taree too bolavee bhakti-saaru | Maagile adhyaayee kathaa-anusaaru | Parama kripe vadavilaa ||

Ovee 3

त्या कृपेचा बोध सबळ । ब्रह्म उदधि पावला मेळ । पात्रा मैनावती सबळ । सरिताओघीं दाटली ॥

Transliteration

Tyaa kripechaa bodha sabalu | Brahma udadhi paavalaa melu | Paatraa Mainaavatee sabalu | Saritaa-oghee daatalee ||

Ovee 4

ॐ नमो ब्रह्मार्णवीं दाटली परी । ऐक्यरुप झाली नारी । मोहें पुत्राचे परिवारीं । गुंतलीसे जननी ते ॥

Transliteration

Om namo Brahma-arnavee daatalee paree | Aikyarupa jhaalee naaree | Mohe putraache parivaaree | Guntaleese jananee tey ||

Ovee 5

मनासी म्हणे अहा कैसें । त्रिलोचनरायाचें जाहले जैसें । त्याचि नीतीं होईल तैसें । मम सुताचें काय करुं ॥

Transliteration

Manaasee mhane ahaa kaise | Trilochana-raayaache jaahale jaise | Tyaachi neetee hoeela taise | Mama sutaache kaaya karu ||

Ovee 6

जंव जंव पाहे त्यातें दृष्टीं । तंव तंव वियोग वाटे पोटीं । हृदयीं कवळूनि जठरवेष्टी । होत असे मोहानें ॥

Transliteration

Java java paahe tyaate drishtee | Tava tava viyoga vaate potee | Hridayee kavaluni jathara-veshtee | Hota ase mohaane ||

Ovee 7

अहा पुत्राचे चांगुलपण । दिसे जैसा प्रत्यक्ष मदन । परी काय करावें चांगुलपण । भस्म होईल स्मशानीं ॥

Transliteration

Ahaa putraache chaangula-panu | Dise jaisaa pratyaksha madanu | Paree kaaya karaave chaangula-panu | Bhasma hoeela smashaanee ||

Ovee 8

उत्कृष्टपणें करोनि कष्ट । धाम उभाविलें अति श्रेष्ठ । परी वन्हीबळें लागल्या काष्ठ । तेवीं असे काळाग्नी ॥

Transliteration

Utkrishta-pane karoni kashtu | Dhaama ubhaavile ati shreshthu | Paree vanheebale laagalyaa kaashthu | Tevee ase kaalaagnee ||

Ovee 9

पहा पल्लवपत्रझाड । अति विशाळ लावला पाड । परी गाभारी वेष्टितां भिरुड । उशाशीं काळ बैसला ॥

Transliteration

Pahaa pallava-patra-jhaadu | Ati vishaala laavalaa paadu | Paree gaabhaaree veshtitaa bhirudu | Ushaashee kaala baisalaa ||

Ovee 10

तन्याये दिसूनि येत । वायां जाईल ऐसा सुत । कीं कद्रूलागीं चोखट अमृत । फिकारपणें मिरविले ॥

Transliteration

Tannyaaye disuni yetu | Vaayaa jaaeela aisaa sutu | Kee Kadroo-laagee chokhata amritu | Phikaara-pane miravile ||

Ovee 11

कीं यत्नेंकरुनि कचें दुर्घट । संजीवनीचा केला पाठ । परी देवयानीचा शाप उल्हाट । यत्र व्यर्थ तो झाला ॥

Transliteration

Kee yatne-karuni Kache durghatu | Sanjeevaneechaa kelaa paathu | Paree Devayaaneechaa shaapa ulhaatu | Yatra vyartha toh jhaalaa ||

Ovee 12

कीं सुंदर जाया कर्मे जारिणी । परी पतिभयाचा धाक मनीं । तेवीं तो उशाशीं काळ बैसोनि । सकळ जनां मिरवला ॥

Transliteration

Kee sundara jaayaa karme jaarinee | Paree pati-bhayaachaa dhaaka manee | Tevee toh ushaashee kaala baisoni | Sakala janaa miravalaa ||

Ovee 13

कीं कुसुमशेज मृदुलाकार । परी उसां घालूनि निजे विखार । ते सुखनिद्रेचा व्यापार । सुखा लाहे केउता ॥

Transliteration

Kee kusuma-sheja mridula-aakaaru | Paree usaa ghaaluni nije vikhaaru | Tey sukha-nidrechaa vyaapaaru | Sukhaa laahe keutaa ||

Ovee 14

तन्न्यायें झालें येथ । राजवैभव अपरिमित । परी काळचक्राची सबळ बात । भ्रमण करीत असे पैं ॥

Transliteration

Tannyaaye jhaale yethu | Raaja-vaibhava aparimitu | Paree kaala-chakraachee sabala baatu | Bhramana kareeta ase pai ||

Ovee 15

ऐसी सदासर्वकाळ । चित्तीं वाहे माय तळमळ । परी सुतासी बोध कराया बळ । अर्थ कांहीं चालेना ॥

Transliteration

Aisee sadaa-sarva-kaalu | Chittee vaahe Maaya talamalu | Paree sutaasee bodha karaayaa balu | Artha kaanhee chaalenaa ||

Ovee 16

तंव कोणी ऐके दिवशीं । शीतकाळ मावमासीं । उपरी सहपरिचारिकेंसीं । उष्ण घेत बैसलीसे ॥

Transliteration

Tava konee aike divashee | Sheeta-kaala maava-maasee | Uparee saha-parichaarikensee | Ushna gheta baisaleese ||

Ovee 17

ते संधींत गोपीचंद । चौकीविभागीं सकळ स्त्रीवृंद । वेष्टूनि स्नान कराया सिद्ध । चंदनचौकीं बैसला ॥

Transliteration

Tey sandheenta Gopeechandu | Chaukee-vibhaagee sakala stree-vrindu | Veshtuni snaana karaayaa siddhu | Chandana-chaukee baisalaa ||

Ovee 18

चंदनचौकी परी ते कैशी । हेमतगंटी रत्न जैशीं । जडावकोंदणी नक्षत्रांसीं । राजवृंदीं चमकतसे ॥

Transliteration

Chandana-chaukee paree tey kaishee | Hema-tagantee ratna jaishee | Jadaava-kondanee nakshatraansee | Raaja-vrindee chamakatase ||

Ovee 19

सकळ काढूनि अंगींचें भूषण । वरी विराजे राजनंदन । उष्ण उदकीं करीत दंतधावन । चौकीवरी बैसला ॥

Transliteration

Sakala kaadhuni angeenche bhooshanu | Varee viraaje raaja-nandanu | Ushna udakee kareeta danta-dhaavanu | Chaukee-varee baisalaa ||

Ovee 20

तों सौधउपरी मैनावती । झाली स्वसुतातें पाहती । देखिला जैसा पूर्ण गभस्ती । तेजामाजी डवरला ॥

Transliteration

Toh saudha-uparee Mainaavatee | Jhaalee sva-sutaate paahatee | Dekhilaa jaisaa poorna gabhastee | Tejaa-maajee davvaralaa ||

Ovee 21

राजसेवकांचे भोवतें वेष्टन । परिचारिका वाहती जीवन । परी त्या मंडळांत नृपनंदन । चांगुलपणीं मिरवतसे ॥

Transliteration

Raaja-sevakaanche bhovate veshtanu | Parichaarikaa vaahatee jeevanu | Paree tyaa mandalaanta nripa-nandanu | Chaangula-panee miravatase ||

/////////condensed ovee 22, 23 oral version///////

Ovee 22, 23

जैसा अपार पाहतां स्वनंदन । मोहें आलें उदरवेष्टन । तेणें लोटलें अपार जीवन । चक्षूंतूनि झराटलें ॥

Transliteration

Jaisaa apaara paahataa sva-nandanu | Mohe aale udara-veshtanu | Tene lotale apaara jeevanu | Chakshoontuni jharaatale ||

///////////original printed text version///////

Ovee 22

जैसा अपार नक्षत्रपंक्ती । आव्हानी उडुगणपती । कीं हेमचौकीं कोंदणस्थिति । रत्नतेजीं मिरवत ॥

Transliteration

Jaisaa apaara nakshatra-panktee | Aavhaanee udugana-patee | Kee hema-chaukee kondana-sthiti | Ratna-tejee miravatu ||

Ovee 23

ऐसा पाहतां स्वनंदन । मोहें आलें उदरवेष्टन । तेणें लोटलें अपार जीवन । चक्षूंतूनि झराटलें ॥

Transliteration

Aisaa paahataa sva-nandanu | Mohe aale udara-veshtanu | Tene lotale apaara jeevanu | Chakshoontuni jharaatale ||

Ovee 24

परी ते बुंद अकस्मात । मोहें घ्राणाचे उद्भव व्यक्त । गोपीचंद चातकातें । स्पर्शावया धांवले हो ॥

Transliteration

Paree tey bunda akasmaatu | Mohe ghraanaache udbhava vyaktu | Gopeechanda chaatakaate | Sparshaavayaa dhaavale ho ||

Ovee 25

म्हणाल बुंद चक्षुदकीं । नोहे उरते सत्कर्मवाकीं । उत्तम फळांचें लक्षूनि सेकी । व्यक्त जलें ते अंगासी ॥

Transliteration

Mhanaala bunda chakshu-dakee | Nohe urate satkarma-vaakee | Uttama phalaanche lakshuni sekee | Vyakta jale tey angaasee ||

Ovee 26

बुंद नव्हती ते चिंतामणी । हरुष केला भवकाचणीं । कीं कृतांतभयातें संजीवनी । भूपशरीरा आदळले ॥

Transliteration

Bundanavhatee tey chintaa-manee | Harusha kelaa bhava-kaachanee | Kee Kritaanta-bhayaate sanjeevanee | Bhoopa-shareeraa aadalale ||

Ovee 27

कीं अर्के पीडित भारी । नृपजन वेष्टला नगरीं । तैं ते उतरले घन मनहरी । बुंदवेश धरुनियां ॥

Transliteration

Kee arke peedita bhaaree | Nripajana veshtalaa nagaree | Tai tey utarale ghana manaharee | Bundavesha dharuniyaa ||

Ovee 28

कीं काळक्षुधेचा पेटला अनळ । तेणें शरीर झालें विकळ । ते संधींत होऊनि कृपाळू । कामधेनु उतरली ॥

Transliteration

Kee kaala-kshudhechaa petalaa analu | Tene shareera jhaale vikalu | Tey sandheenta houni kripaaloo | Kaama-dhenu utaralee ||

Ovee 29

कीं दरिद्राचें अतिवेष्टन । तैसा येथें मिरविला कुबेर येऊन । तन्न्याय सुबुंद घन । रावहृदयीं आदळले ॥

Transliteration

Kee daridraache ati-veshtanu | Taisaa yethe miravilaa Kubera yeunu | Tannyaaya subunda ghanu | Raava-hridayee aadalale ||

Ovee 30

शरीरीं होतां बुंद लिप्त । परी उद्भवस्थिती लागली त्यांत । म्हणूनि ऊर्ध्व करुनि मूर्धातें । नभालागीं विलोकी ॥

Transliteration

Shareeree hotaa bunda liptu | Paree udbhava-sthitee laagalee tyaatu | Mhanuni oordhva karuni moordhaate | Nabhaa-laagee vilokee ||

Ovee 31

हृदयीं होऊनि राव शंकित । म्हणे बुंद कैंचा उद्भवला येथ । तरी अंबर झालें असेल व्यक्त । घनमंडळ आगळें ॥

Transliteration

Hridayee houni raava shankitu | Mhane bunda kainchaa udbhavalaa yethu | Taree ambara jhaale asela vyaktu | Ghana-mandala aagale ||

Ovee 32

म्हणूनि ऊर्ध्व करुनि दृष्टी । पाहता झाला नभापोटीं । परी ते निर्मळपणें वृष्टी । झाली कोठूनि म्हणतसे ॥

Transliteration

Mhanuni oordhva karuni drishtee | Paahataa jhaalaa nabhaa-potee | Paree tey nirmala-pane vrishtee | Jhaalee kothuni mhanatase ||

Ovee 33

ऐसा विचार करितां चित्तीं । दृष्टिगोचरी संभविती । तों रुदन करितां मैनावती । निजदृष्टीं देखिली ॥

Transliteration

Aisaa vichaara karitaa chittee | Drishtigocharee sambhavitee | Toh rudana karitaa Mainaavatee | Nija-drishtee dekhilee ||

Ovee 34

करीत होता दंतधावन । तैसाचि उठला नृपनंदन । उपरी त्वरा वेगीं चढून । मातेपाशीं पातला ॥

Transliteration

Kareeta hotaa danta-dhaavanu | Taisaachi uthalaa nripa-nandanu | Uparee tvaraa vegee chadhunu | Maate-paashee paatalaa ||

Ovee 35

जातांचि पदीं ठेवूनिया माथा । उभा जोडूनि हस्तां । म्हणे सांग जी कवण अर्था । उचंबळलीस जननीये ॥

Transliteration

Jaataanchi padee thevuniyaa maathaa | Ubhaa joduni hastaa | Mhane saanga jee kavana arthaa | Uchambalaleesa jananeeye ||

Ovee 36

मजसारखा तूतें सुत । राज्याधीश महीं व्यक्त । ऐसा असूनि दुःखपर्वत । कोठूनि उदेला तंव चित्तीं ॥

Transliteration

Majasaarakhaa toote sutu | Raajyaadheesha mahee vyaktu | Aisaa asuni duhkhaparvatu | Kothuni udelaa tava chittee ||

Ovee 37

पाहें पाहें प्रताप आगळा । न वर्णवे बळ वळियांकित महीपाळा । मिरवती दर्पकंदर्प केवळा । करभारातें योजिती ॥

Transliteration

Paahe paahe prataapa aagalaa | Na varnave bala valiyaankita mahee-paalaa | Miravatee darpa-Kandarpa kevalaa | Karabhaaraate yojitee ||

Ovee 38

ऐसी असतां बळसंपत्ती । बोललें कुणी दुःखसरितीं । तरी मम कोपाचा दाहक गभस्ती । सांवरेल कोणातें ॥

Transliteration

Aisee asataa bala-sampattee | Bolale kunee duhkha-saritee | Taree mama kopaachaa daahaka gabhastee | Saavarela konaate ||

Ovee 39

जेणें पाहिलें असेल नयनीं । उगीच तीव्र दृष्टी करोनि । तरी तयाचे क्षणें चक्षु काढोनि । तव करी माय ओपीन गे ॥

Transliteration

Jene paahile asela nayanee | Ugeecha teevra drishtee karoni | Taree tayaache kshane chakshu kaadhoni | Tava karee maaya opeena ge ||

Ovee 40

किंवा दाविलें असें बोटीं । तरी तींच बोटें काढीन शेवटीं । तरी कवण अर्थ उदेला पोटीं । रुदन कराया जननीये ॥

Transliteration

Kivaa daavile ase botee | Taree teencha bote kaadheena shevatee | Taree kavana artha udelaa potee | Rudana karaayaa jananeeye ||

Ovee 41

अष्टविंशति स्त्रीमंडळ । कीं त्यांनीं ओपिलें कडुवट फळ । तरी शिक्षा करुनि तयां सबळ । मोक्षपंथा मिरवीन ॥

Transliteration

Ashta-vinshati stree-mandalu | Kee tyaannee opile kaduvata phalu | Taree shikshaa karuni tayaa sabalu | Moksha-panthaa miraveenu ||

Ovee 42

किंवा माझिये दृष्टी सेवेशीं । उदया पावला अंतर शेषीं । म्हणूनि उदय शोकानिशी । दर्शविली त्वां मातें ॥

Transliteration

Kivaa maajhiye drishtee seveshee | Udayaa paavalaa antara sheshee | Mhanuni udaya shokaa-nishee | Darshavilee tvaa maate ||

Ovee 43

तरी कोणता कवण अर्थ । माते वदे प्रांजळवत । कामनीं वेधक असेल चित्त । तोचि वेध निवटीन मी ॥

Transliteration

Taree konataa kavana arthu | Maate vade praanjalavatu | Kaamanee vedhaka asela chittu | Tochi vedha nivateena mee ||

Ovee 44

म्हणसील कार्य आहे थोर । करुं न शके सुत पामर । तरी हा देह वेंचूनि समग्र । अर्थ तुझा पुरवीन मी ॥

Transliteration

Mhanaseela kaarya aahe thoru | Karu na shake suta paamaru | Taree haa deha venchuni samagru | Artha tujhaa puraveena mee ||

Ovee 45

जरीं ऐशिया दृष्टीं । अंतर पडेल काय पोटीं । तरी धिक्कार असो मज शेवटीं । पुत्रधर्म मिरवावया ॥

Transliteration

Jaree aishiyaa drishtee | Antara padela kaaya potee | Taree dhikkaara aso maja shevatee | Putra-dharma miravaavayaa ||

Ovee 46

मग श्वान सूकर काय थोडीं । अवतार मिरविती द्वारीं पवाडी । याचि नीति तया प्रौढीं । निर्माण झालों मी एक ॥

Transliteration

Maga shvaana sookara kaaya thodee | Avataara miravitee dvaaree pavaadee | Yaachi neeti tayaa praudhee | Nirmaana jhaalo mee eku ||

Ovee 47

अहा पुत्रधर्म मग कैसा । माता पिता दुखलेशा । पाहूनि चित्तीं परी हरुषा । भूभार तो नर एक ॥

Transliteration

Ahaa putra-dharma maga kaisaa | Maataa pitaa dukhaleshaa | Pahuni chittee paree harushaa | Bhoobhaara toh nara eku ||

Ovee 48

आपण मिरवे राणिवा प्रकरणीं । मातापिता दैन्यवाणीं । तयाचे भारें सकळ मेदिनी । विव्हळ दुःखे होतसे ॥

Transliteration

Aapana mirave raanivaa prakaranee | Maataapitaa dainyavaanee | Tayaache bhaare sakala medinee | Vivhala duhkhe hotase ||

Ovee 49

कांतेलागी शृंगार व्यक्त । मातेसी वसन नेसावया भ्रांत । तयाचे भारीं धरा समस्त । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Kaante-laagee shringaara vyaktu | Maatesee vasana nesaavayaa bhraantu | Tayaache bhaaree dharaa samastu | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 50

कांतेसी नेसावया वस्त्र भरजरी । माता ग्रंथीं चीर सावरी । तयाचे भारें सकळ धरित्री । विव्हळ दुःखे होतसे ॥

Transliteration

Kaantesee nesaavayaa vastra bharajaree | Maataa granthee cheera saavaree | Tayaache bhaare sakala dharitree | Vivhala duhkhe hotase ||

Ovee 51

कांतेसी इच्छा समान देणें । मातेसीं खावया न मिळे अन्न । तयाचे भारें पृथ्वी सधन । विव्हळ दुःखे होतसे ॥

Transliteration

Kaantesee ichchaa samaana dene | Maatesee khaavayaa na mile annu | Tayaache bhaare prithvee sadhanu | Vivhala duhkhe hotase ||

Ovee 52

कांतेसी बसावया उंच आसन । मातेसी कष्टवी दासीसमान । तयाचे भारे धरारत्न । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Kaantesee basaavayaa uncha aasanu | Maatesee kashtavee daasee-samaana | Tayaache bhaare dharaa-ratnu | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 53

रंभेसमान कांता ठेवी । भूतासमान माता मिरवी । तयाचे भारें धरादेवी । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Rambhe-samaana kaantaa thevee | Bhootaa-samaana maataa miravee | Tayaache bhaare dharaa-Devee | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 54

जन्म घेतला जियेचे पोटीं । तीते म्हणे परम करंटी । तयाचे भारें धरा हिंपुटी । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Janma ghetalaa jiyeche potee | Teete mhane parama karantee | Tayaache bhaare dharaa himputee | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 55

कांता सर्व सुखाचे मेळीं । माता दुःखे अश्रु ढाळी । तयाचे भारें धरा विव्हळी । आणि (अति) दुःखी होतसे ॥

Transliteration

Kaantaa sarva sukhaache melee | Maataa duhkhe ashru dhaalee | Tayaache bhaare dharaa vivhalee | Aani (Ati) duhkhee hotase ||

Ovee 56

कांतेलागीं मृदु भाषण । मातेसी हृदयीं खोंची बाण । तयाचे भारें धरारत्न । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Kaante-laagee mridu bhaashanu | Maatesee hridayee khonchee baanu | Tayaache bhaare dharaa-ratnu | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 57

आपण मिरवे राणिवासरसा । पितया काळा मातंग जैसा । तयाचे भारें धरा क्लेशा । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Aapana mirave raani-vaasarasaa | Pitayaa kaalaa maatanga jaisaa | Tayaache bhaare dharaa kleshaa | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 58

आपण कंठी कुडचा पहुडी । पित्याशिरीं बत्या जोडी । तयाचे भारें धरा मुख मुरडी । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Aapana kanthee kudyaa pahudee | Pityaashiree batyaa jodee | Tayaache bhaare dharaa mukha muradee | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 59

आपण भक्षी सदा सुरस अन्न । पितर मागती भिक्षा कदन्न । तयाचे भारें धरारत्न । विव्हळ दुःखी होतसे ॥

Transliteration

Aapana bhakshee sadaa surasa annu | Pitara maagatee bhikshaa kadannu | Tayaache bhaare dharaa-ratnu | Vivhala duhkhee hotase ||

Ovee 60
तरी ऐसिये पुत्र सृष्टीं । गळावेत गर्भीहून शेवटीं । तन्न्याय अर्थ पोटीं । माझा न धरी जननीये ॥

Transliteration

Taree aisiye putra srishtee | Galaaveta garbhee-huna shevatee | Tannyaaya artha potee | Maajhaa na dharee jananeeye ||

Ovee 61
जे तुज वेधक मनकामना । तयासाठीं वेचीन प्राणा । परी माये वो तव वासना । पूर्ण करीन निश्चयेसी ॥

Transliteration

Je tuja vedhaka mana-kaamanaa | Tayaa-saathee vecheena praanaa | Paree maaye vo tava vaasanaa | Poorna kareena nishchayesee ||

Ovee 62
ऐसी बोलता स्वसुत वार्ता । प्रेमाब्धि उचंबळला चित्ता । मग हितार्थरत्न द्यावया हाता । वाग्लहरी उचंबळे ॥

Transliteration

Aisee bolataa svasuta vaartaa | Prema-abdhi uchambalalaa chittaa | Maga hita-artha-ratna dyaavayaa haataa | Vaaglaharee uchambale ||

Ovee 63
म्हणे बा रे ऐक वचन । प्रेम उदयाचळीं तूं दिव्यरत्न । उदय पावलासी चंडकिरण । शत्रुतम निवटावया ॥

Transliteration

Mhane baa re aika vachanu | Prema udaya-achalee too divyaratnu | Udaya paavalaasee chanda-kiranu | Shatrutama nivataa-vayaa ||

Ovee 64
तया ठायीं अंधकारु । मज पीडा काय बा करणार । परिस लाधल्या वसतिस दरिद्र । स्वप्नामाजी नांदेना की ॥

Transliteration

Tayaa thaayee andhakkaru | Maja peedaa kaaya karanaaru | Parisa laadhalyaa vasati-sadaridru | Svapnaa-maajee naandenaa ki ||

Ovee 65
बा रे तव प्रताप दर्प । पादरज झाले भूप । ऐसें असतां कोप कंदर्प । मातें कोण विवरील ॥

Transliteration

Baa re tava prataapa darpu | Paadaraja jhaale bhoopu | Aise asataa kopa Kandarpu | Maate kona vivareelu ||

Ovee 66
बा रे तीव्र प्रतापी स्थावर केसरी । तयाचे लेकुरा वारण मारी । हा विपर्यास कवणेपरी । मिरवूं लाहे जगातें ॥

Transliteration

Baa re teevra prataapee sthaavara kesaree | Tayaache lekuraa vaarana maaree | Haa viparyaasa kavaneparee | Miravoo laahe jagaate ||

Ovee 67
राया नरेंद्रा तुझी मी माता । मातें कोण होय गांजिता । परी चिंता उदरी मोहव्यथा । शोकतरु उद्भवला ॥

Transliteration

Raayaa narendraa tujhee mee maataa | Maate kona hoya gaanjitaa | Paree chintaa udaree moha-vyathaa | Shoka-taru udbhavalaa ||

Ovee 68

बा रे तव स्वरुप पूर्ण अर्क । पाहतां मातें उदेला शोक । म्हणशील जरी अर्थदायक । कवणापरी उदेला तो ॥

Transliteration

Baa re tava svarupa poorna Arku | Paahataa maate udelaa shoku | Mhanasheela jaree arthadaayaku | Kavanaa-paree udelaa toh ||

Ovee 69

बा रे तव पिता तव समान । स्वरुप उदेलें अर्कप्रमाण । परी काळ अस्थाचळीं जाऊन । गुप्त झाला पुरुष तो ॥

Transliteration

Baa re tava pitaa tava samaanu | Svarupa udele Arka-pramaanu | Paree kaala asthaachalee jaunu | Gupta jhaalaa purusha toh ||

Ovee 70

अहा अपार तो स्वरुपाब्धी । अंती वेष्टी वडवानळसंधी । पडतां बा रे विशाळ बुद्धी । भस्म झाला क्षणांतरीं ॥

Transliteration

Ahaa apaara toh svarupa-abdhee | Antee veshtee vadavaanala-sandhee | Padataa baa re vishaala buddhee | Bhasma jhaalaa kshanaantaree ||

Ovee 71

अस्थी जळाल्या काष्ठासमान । लोभ दाहिलें जेउतें तृण । मांसस्नेहाचें होऊनि शोषण । स्वरुपातें लोपला तों ॥

Transliteration

Asthee jalaalyaa kaashthaa-samaanu | Lobha daahile jeute trinu | Maansa-snehaache houni shoshanu | Svarupaate lopalaa toh ||

Ovee 72

तंव त्या भयाची हुडहुडी मोठी । बा रे मज उदेली पोटीं । तुझें स्वरुप पाहतां दृष्टीं । भयातें उठी उठावे ॥

Transliteration

Tava tyaa bhayaachee hudahudee mothee | Baa re maja udelee potee | Tujhe svarupa paahataa drishtee | Bhayaate uthee uthaave ||

Ovee 73

बा रे कृतांत महीं विखार । घुसघुशीत वारंवार । टपूनि बैसला जैसा मांजर । मूषकातें उचलावया ॥

Transliteration

Baa re Kritaanta mahee vikhaaru | Ghusaghusheeta vaaram-vaaru | Tapuni baisalaa jaisaa maanjaru | Mooshakaate uchalaavayaa ||

Ovee 74

जैसा व्याघ्र जपे गाई । कीं मीन वेंची बगळा प्रवाहीं । तैसें जगातें तन्र्यायीं । कृतांत आहारी नटलासे ॥

Transliteration

Jaisaa vyaaghra jape gaaee | Kee meena venchee bagalaa pravaahee | Taise jagaate tannyaayee | Kritaanta aahaaree natalaase ||

Ovee 75

तरी तो व्याघ्र ऐसा सबळ । जिंकूनि योजावा पिंजरीं मेळ । बा रे तैं भयाचा वडवानळ । मग स्पर्शणार नाहीं देहातें ॥

Transliteration

Taree toh vyaaghra aisaa sabalu | Jinkuni yojaavaa pinjaree melu | Baa re tai bhayaachaa vadavaanalu | Maga sparshanaara naahee dehaate ||

Ovee 76

बा रे विखार डंखी दुःख । तोंचि वेंचिल्या सकळ सुख । कंटकीं धरिल्यास सकळ वृश्चिक । वेदनेतें मिरवेना ॥

Transliteration

Baa re vikhaara dankhee duhkhu | Tonchi venchilyaa sakala sukhu | Kantakee dharilyaasa sakala vrishchiku | Vedanete miravenaa ||

Ovee 77

ऐसेपरी रचूनि युक्ती । सकळ हरावा कृतांत गती । व्यर्थ शरीराची माती । करुं नये जन्मल्यानें ॥

Transliteration

Aiseparee rachuni yuktee | Sakala haraavaa Kritaanta gatee | Vyartha shareeraachee maatee | Karunaye janmalyaane ||

Ovee 78

आपण आपुलें पहावें हित । सारासार नरदेहांत । पाहें वश्य करुनि रघुनाथ । चिरंजीव झाला बिभीषण ॥

Transliteration

Aapana aapule pahaave hitu | Saaraasaara nara-dehaantu | Paahe vashya karuni Raghunaathu | Chiranjeeva jhaalaa Bibheeshanu ||

Ovee 79

पाहें नारद वैष्णव कैसा । विष्णु राधी नरवेषा । तों श्रीगुरु वरदेषा । अमरपणीं मिरविला ॥

Transliteration

Paahe Naarada vaishnava kaisaa | Vishnu raadhee naraveshaa | Toh shreeguru varadeshaa | Amarapanee miravilaa ||

Ovee 80

त्याचि नारदासी कृपाधन । बोलला श्रीव्यास महीकारण । तेणें पिकलें ब्रह्मपण । शुक महाराज तिसरा ॥

Transliteration

Tyaachi Naaradaasee kripaa-dhanu | Bolalaa shree-Vyaasa mahee-kaaranu | Tene pikale Brahma-panu | Shuka Mahaaraaja tisaraa ||

Ovee 81

त्याचा कौशिक अनुगृहीत । तेणें करोनि शरणागत । कृष्णयाज्ञवल्की तारुनि निश्चित । तेणें तारिला रामानुज ॥

Transliteration

Tyaachaa Kaushika anugriheetu | Tene karoni sharanaagatu | Krishna-yaajnyavalkee taaruni nishchitu | Tene taarilaa Raamaanuju ||

Ovee 82

ऐसा प्रकाश (प्रसाद) सांप्रदाय मिरवून । ते पुरुष झाले ब्रह्मसनातन । तेवीं तूं बाळा माझा नंदन । जगामाजी मिरवीं कां ॥

Transliteration

Aisaa prakasha (prasaada) saampradaaya miravunu | Tey purusha jhaale Brahma-sanaatanu | Tevee too baalaa maajhaa nandanu | Jagaa-maajee miravee kaa ||

Ovee 83

ऐसें बोधितां मैनावती । संपली येथूनि तिची उक्ति । परी श्रोते कवि ते संप्रदाय पुसती । सांगा म्हणती चातुर्य ॥

Transliteration

Aise bodhitaa Mainaavatee | Sampalee yethuni tichee ukti | Paree shrote kavi tey sampradaaya pusatee | Saangaa mhanatee chaaturyu ||

Ovee 84

ऐसा प्रश्न कवि पाहून । सांगे संप्रदाय पूर्ण । रामानुजापासून । योगिया संत पैं झाला ॥

Transliteration

Aisaa prashna kavi pahunu | Saange sampradaaya poornu | Raamaanujaa-paasunu | Yogiyaa santa pai jhaalaa ||

Ovee 85

तयापासूनि मुकुंदराज । मुकुंदराजाचा जैत्पाल भोज । जैत्पालाचा धर्मानुज । बोधल्यादिक पैं त्याचे ॥

Transliteration

Tayaa-pasuni Mukundaraaju | Mukundaraajaachaa Jaitpaala bhoju | Jaitpaalaachaa Dharmaanuju | Bodhalyaadika pai tyaache ||

Ovee 86

यापरी द्वितीय संप्रदायी । माता सुतातें लोटी बोधप्रवाहीं । उमेनें आराधोनि शिवगोसावी । चैतन्यसंप्रदायीं मिरवला ॥

Transliteration

Yaaparee dviteeya sampradaayee | Maataa sutaate lotee bodha-pravaahee | Umene aaraadhoni Shiva-gosaavee | Chaitanya-sampradaayee miravalaa ||

Ovee 87

त्यानें बोधिला कपिलनामी । आणि दुसरा राघवचैतन्यस्वामी । राघवाचा ब्रह्मचैतन्य नेमी । तयाचा केशवचैतन्य ॥

Transliteration

Tyaane bodhilaa Kapilanaamee | Aani dusaraa Raaghava-Chaitanya-svaamee | Raaghavaachaa Brahma-Chaitanya nemee | Tayaachaa Keshava-Chaitanyu ||

Ovee 88

केशवाचा बाबाचैतन्य । श्रीतुकाराम त्याचा धन्य धन्य । हा चैतन्यसंप्रदाय उत्तम मान्य । संतगणीं मिरवितो ॥

Transliteration

Keshavaachaa Baabaa-Chaitanyu | Shree-Tukaaraama tyaachaa dhanya dhanyu | Haa Chaitanya-sampradaaya uttama maanyu | Santaganee miravito ||

Ovee 89

यापरी तिसरा संप्रदाय । महाश्रेष्ठ म्हणती स्वरुपमय । तरी प्रथम बोधिला कमलोद्भव । हंसरुपें श्रीविष्णुनें ॥

Transliteration

Yaaparee tisaraa sampradaayu | Mahaashreshtha mhanatee svarupamayu | Taree prathama bodhilaa kamalodbhavu | Hansarupe shreevishnune ||

Ovee 90

ते विधीचे सकळ हित । अत्रीनें घेतले सकळ पंथ । अत्रीपासूनि झाले दत्त । तयापासूनि नाथ सकळ ॥

Transliteration

Tey vidheeche sakala hitu | Atreene ghetale sakala panthu | Atreepaasuni jhaale Dattu | Tayaa-pasuni Naatha sakalu ||

Ovee 91

यापरी सांप्रदाय पाहें । चवथा नंद महीतें आहे । सूर्यापासूनि याज्ञवल्की पाहे । ब्रह्मवेत्ता मिरवला ॥

Transliteration

Yaaparee saampradaaya paahe | Chavathaa nanda maheete aahe | Sooryaapaasuni Yaajnyavalkee paahe | Brahmavettaa miravalaa ||

Ovee 92

तयापासूनि सहजानंद । सहजानंदाचा कूर्म अवतार प्रसिद्ध । कूर्मानें उपदेशिला ब्रह्मानंद । ब्रह्मानंदाचा योगानंद कीं ॥

Transliteration

Tayaa-pasuni Sahajaanandu | Sahajaanandaachaa Koorma avataara prasiddhu | Koormaane upadeshilaa Brahmaanandu | Brahmaanandaachaa Yogaananda kee ||

Ovee 93

योगानंदाचा चिदानंद । जगीं मिरवत आहे प्रसिद्ध । तरी तुवां गोपीचंद । हित करुनि घेई कां ॥

Transliteration

Yogaanandaachaa Chidaanandu | Jagee miravata aahe prasiddhu | Taree tuvaa Gopeechandu | Hita karuni gheyee kaa ||

Ovee 94

तेणेंकरुनि अमरपणीं । जगीं मिरविसी महाप्राज्ञी । यास्तव बा रे माझे नयनीं । अश्रू लोटले तुजलागी ॥

Transliteration

Tenekaruni amarapanee | Jagee miravisee mahaapraajnyee | Yaastava baa re maajhe nayanee | Ashroo lotale tujalaagee ||

///////// Oral Ovee 95, 96 condensed version/////////

याउपरी बोले नृपनाथ । बोलसी माते सत्यार्थ । परी प्रस्तुतकाळीं ऐसा नाथ । कोण मिळेल कोठूनि होईल जननीये ॥

Transliteration

Yaauparee bole nripa-Naathu | Bolasee maate satya-arthu | Paree prastutakaalee aisaa Naathu | Kona milela Kothuni hoeela jananeeye ||

/////////original printed version//////

Ovee 95

याउपरी बोले नृपनाथ । बोलसी माते सत्यार्थ । परी प्रस्तुतकाळीं ऐसा नाथ । कोण मिळेल आम्हातें ॥

Transliteration

Yaauparee bole nripa-Naathu | Bolasee maate satya-arthu | Paree prastutakaalee aisaa Naathu | Kona milela aamhaate ||

Ovee 96

मुळींच असेल अमरपणीं । जो ओपील अपरवाणी । ऐसा गोचर आम्हांलागुनी । कोठूनि होईल जननीये ॥

Transliteration

Muleencha asela amarapanee | Jo opeela aparavaanee | Aisaa gochara aamhaa-laagunee | Kothuni hoeela jananeeye ||

Ovee 97

ऐसी ऐकूनि तयाची मात । माता बोलती झाली त्यातें । बा रे तैसाचि आपुले गांवांत । जालिंदरनाथ मिरवला ॥

Transliteration

Aisee aikuni tayaachee maatu | Maataa bolatee jhaalee tyaate | Baa re taisaachi aapule gaavaatu | Jaalindara-Naatha miravalaa ||

Ovee 98

स्वरुप सांप्रदाय परिपूर्ण । तूतें करील ब्रह्मसनातन । तरी तूं कायावाचामनें करुन । शरण जाईं तयासी ॥

Transliteration

Svarupa saampradaaya paripoornu | Toote kareela Brahma-sanaatanu | Taree too kaayaavaachaa-mane karunu | Sharana jaaee tayaasee ||

Ovee 99

बा रे तुझें वैभव थोर । राजकारणी कारभार । परी मायिक सकळ विस्तार । लया जाईल बाळका ॥

Transliteration

Baa re tujhe vaibhava thoru | Raaja-kaa-ranee kaarabhaaru | Paree maayika sakala vistaaru | Layaa jaaeela baalakaa ||

Ovee 100

तरी तनमनधनप्राण । शरण रिघावें तयाकारण । आपुलें हित अमरपण । जगामाजीं मिरवीं कां ॥

Transliteration

Taree tanamana-dhanapraanu | Sharana righaave tayaa-kaaranu | Aapule hita amarapanu | Jagaa-maajee miravee kaa ||

Ovee 101

ऐसें ऐकोनि मातेचें वचन । बोलता झाला त्रिलोचननंदन । म्हणे माते तयासी शरण । जालिया योग्यता फिरावें ॥

Transliteration

Aise aikoni maateche vachanu | Bolataa jhaalaa ttrilochana-nandanu | Mhane maate tayaasee sharanu | Jaaliyaa yogyataa phiraave ||

Ovee 102

सकळ टाकूनि सुखसंपत्ति । राजवैभव दारासुती । आप्तवर्गादि सोयरेजाती । टाकूनि योग कैसा करावा कीं ॥

Transliteration

Sakala taakuni sukhasampatti | Raaja-vaibhava daaraasutee | Aaptavargaadi soyarejaatee | Taakuni yoga kaisaa karaavaa kee ||

Ovee 103

द्वादशवरुषें मातें । भोगूं दे सकळ वैभवातें । मग शरण रिघूनि त्यातें । योगालागीं कशीन कीं ॥

Transliteration

Dvaadasha-varushe maate | Bhogoo de sakala vaibhavaate | Maga sharana righuni tyaate | Yogaalaagee kasheena kee ||

Ovee 104

कशीन तरी परी कैसा । मिरवीन ब्रह्मांडांत ठसा । कीं उत्तानपादराजसुतापरी । शिक्का जगामाजी मिरवीन ॥

Transliteration

Kasheena taree paree kaisaa | Miraveena Brahmaandaanta thasaa | Kee Uttaana-paadaraaja-sutaaparee | Shikkaa jagaa-maajee miraveenu ||

Ovee 105

माता म्हणे बाळा परियेसीं । पळ घडी भरंवसा नाहीं देहासी । तेथे संवत्सर म्हणतां द्वादशी । देखिले कोणी बाळका ॥

Transliteration

Maataa mhane baalaa pariyesee | Pala ghadee bharavasaa naahee dehaasee | Tethe samvatsara mhanataa dvaadashee | Dekhile konee baalakaa ||

Ovee 106

चित्त वित्त आणि जीवित्व आपुलें । अचळ नोहे अशाश्वत ठेलें । क्षणैक काय होईल न कळे । क्षणभंगुर वर्ततसे ॥

Transliteration

Chitta vitta aani jeevitva aapule | Achala nohe ashaashvata thele | Kshanaika kaaya hoeela na kale | Kshana-bhangura vartatase ||

Ovee 107

बा रे उदकावरील बुडबुडा । कोण पाहील अशाश्वत चाडा । वंध्यापुत्रें घेतला वाडा । मृगजळा केवीं तृषार्त ॥

Transliteration

Baa re udakaavareela budabudaa | Kona paaheela ashaashvata chaadaa | Vandhyaa-putre ghetalaa vaadaa | Mrigajalaa kevee trishaartu ||

Ovee 108

तेवीं वारे सहजस्थितीं । बोलतां न ये अशाश्वती । स्वप्नप्रवाहीं इंद्रपदासी । भोगीत खरे न मानावें ॥

Transliteration

Tevee vaare sahaja-sthitee | Bolataa na ye ashaashvatee | Svapna-pravaahee Indrapadaasee | Bhogeeta khare na maanaave ||

Ovee 109

तन्न्याय अभासपर । सकळ मिरवतसे चराचर । त्यांतूनि कोणीएक रणशूर । शाश्वतपदा मिरवितसे ॥

Transliteration

Tannyaaya abhaasaparu | Sakala miravatase charaacharu | Tyaantuni koneeeka ranashooru | Shaashvata-padaa miravitase ||

Ovee 110

शुक दत्तात्रेय कपिलमुनी । व्यास वसिष्ठाची मांडणी । प्रल्हादादिक भागवतधर्मी । ऐसे कोणी निवडिले ॥

Transliteration

Shuka Dattaatreya Kapila-Munee | Vyaasa Vasishthaachee maandanee | Pralhaadaadika bhaagavata-dharmee | Aise konee nivadile ||

Ovee 111

नाहींतरी होताती थोडीं । सकळ बांधिली प्रपंचवेडीं । परी यमरायाच्या रक्षकवाडी । एकसरां कोंडिलीं ॥

Transliteration

Naaheentaree hotaatee thodee | Sakala baandhilee prapancha-vedee | Paree yama-raayaachyaa rakshaka-vaadee | Ekasaraa kondilee ||

Ovee 112

म्हणूनि बा रे सांगते तुज । शाश्वत नोहे काळ समस्त । कोणे घडी घडेल केउत । अक्कलकळा कळेना ॥

Transliteration

Mhanuni baa re saangate tuju | Shaashvata nohe kaala samastu | Kone ghadee ghadela keutu | Akkala-kalaa kalenaa ||

Ovee 113

ऐसा बोध माता करितां । लुमावंती तयाची कांता । गुप्तवेषें श्रवण करितां । हाय हाय म्हणतसे ॥

Transliteration

Aisaa bodha maataa karitaa | Lumaavantee tayaachee kaantaa | Guptaveshe shravana karitaa | Haaya haaya mhanatase ||

Ovee 114

म्हणे माता नोहे पापिणी । पुत्रासी योजिती पुत्रकाचणी । ऐसी राज्यविभवमांडणी । जोग देऊं म्हणतसे ॥

Transliteration

Mhane maataa nohe paapinee | Putraasee yojitee putra-kaachanee | Aisee raajya-vibhava-maandanee | Joga deoo mhanatase ||

Ovee 115

तरी राज्यासी आली विवशी । उपाय काय करावा यासी । रामासारिखा पुत्र वनवासीं । कैकैयीनें धाडिला ॥

Transliteration

Taree raaj-yaasee aalee vivashee | Upaaya kaaya karaavaa yaasee | Raamaa-saarikhaa putra vanavaasee | Kaikaiyeene dhaadilaa ||

Ovee 116

स्वभ्रताराचा घेतला प्राण । चतुर्थपुत्रा लाविलें रानोरान । तन्न्याय आम्हांकारणें । देव क्षोभला वाटतसे ॥

Transliteration

Svabhrataaraachaa ghetalaa praanu | Chaturthaputraa laavile raanoraanu | Tannyaaya aamhaankaarane | Deva kshobhalaa vaatatase ||

Ovee 117

दुष्ट स्वप्न दृष्टीं येतां । तर्की मानिती विनाश चित्ता । म्हणतां प्रवेशली दुःखव्यथा । तरी देव क्षोभतात ॥

Transliteration

Dushta svapna drishtee yetaa | Tarkee maanitee vinaasha chittaa | Mhanataa praveshalee duhkhavyathaa | Taree deva kshobhataatu ||

Ovee 118

दासदासी आपुले हाती । आज्ञेमाजी सकळ वर्तती । ते अवज्ञा करोनि उत्तर देती । तरी देव क्षोभला जाणावें ॥

Transliteration

Daasadaasee aapule haatee | Aajnyemaajee sakala vartatee | Tey avajnyaa karoni uttara detee | Taree deva kshobhalaa jaanaave ||

Ovee 119

सहज ठेविलें धनमांदुस । पुढें काढूं जातां कार्यास । तें न सांपडे ठेविल्यास । तरी देवक्षोभ जाणिजे ॥

Transliteration

Sahaja thevile dhanamaandusu | Pudhe kaadhoo jaataa kaaryaasu | Tey na saampade thevilyaasu | Taree deva-kshobha jaanije ||

Ovee 120

सभेस्थानीं सत्यार्थगोष्टी । करितां अनृत वाटे चावटी । लोक बैसती चेष्टेपाठी । तरी देवक्षोभ जाणिजें ॥

Transliteration

Sabhe-sthaanee satyaartha-goshtee | Karitaa anrita vaate chaavatee | Loka baisatee cheshtepaathee | Taree deva-kshobha jaanije ||

Ovee 121

आपुलें धन लोकांवरी सांचे । तें मागूं जातां स्वयें वाचे । ते म्हणती काय घेतले तुझ्या बापाचें । तरी देवक्षोभ जाणिजे ॥

Transliteration

Aapule dhana lokaanvaree saanche | Tey maagoo jaataa svaye vaache | Tey mhanatee kaaya ghetale tujhyaa baapaache | Taree deva-kshobha jaanije ||

Ovee 122

आपुली विद्या तीव्रशस्त्र । शत्रुकाननीं विनाशपात्र । ती कार्यार्थ न मिरवे स्वतंत्र । तरी देवक्षोभ जाणावा ॥

Transliteration

Aapulee vidyaa teevra-shastru | Shatru-kaananee vinaasha-paatru | Tee kaarya-artha na mirave svatantru | Taree deva-kshobha jaanaavaa ||

Ovee 123

नसतां वांकुडें पाऊल कांहीं । नागविला जाय राजप्रवाहीं । नसत्या कळीं बैसल्या ठायीं । तरी देवक्षोभ जाणिजे ॥

Transliteration

Nasataa vaankude paaoola kaanhee | Naaga-vilaa jaaya raaja-pravaahee | Nasatyaa kalee baisalyaa thaayee | Taree deva-kshobha jaanije ||

Ovee 124

आपुला शत्रु प्रतापापुढें । मिरवी जैसा अति बापुडें । त्या शरण रिघतां आपुल्या चाडें । तरी देवक्षोभ जाणिजे ॥

Transliteration

Aapulaa shatru prataapaa-pudhe | Miravee jaisaa ati baapude | Tyaa sharana righataa aapulyaa chaade | Taree deva-kshobha jaanije ||

Ovee 125

लोकां उपकार केला विशेष । तेचि लोक मानिती आपुला त्रास । पाहूं नका म्हणती मुखास । तरी देवक्षोभ जाणिजे ॥

Transliteration

Lokaa upakaara kelaa visheshu | Techi loka maanitee aapulaa traasu | Paahoo nakaa mhanatee mukhaasu | Taree deva-kshobha jaanije ||

Ovee 126

नसता अधिमधीं उतरा । नसतीच विघ्ने येती घरा । तेंचि करणे परिहारा । देवक्षोभ जाणिजे ॥

Transliteration

Nasataa adhimadhee utaraa | Nasateecha vighne yetee gharaa | Tenchi karane parihaaraa | Deva-kshobha jaanije ||

Ovee 127

गृहींचे मनुष्य मुष्टींत सकळ । असूनि वाढे गृहांत कळ । आपुलें न चाले कांहींच बळ । तरी देवक्षोभ जाणिजे ॥

Transliteration

Griheenche manushya mushteenta sakalu | Asuni vaadhe grihaanta kalu | Aapule na chaale kanheencha balu | Taree deva-kshobha jaanije ||

Ovee 128

तरी हेचि नीति उपदेश । माता करीत आहे पुत्रास । तरी बरवें नोहे हा विनाश । जगामाजी मिरवेल ॥

Transliteration

Taree hechi neeti upadeshu | Maataa kareeta aahe putraasu | Taree barave nohe haa vinaashu | Jagaa-maajee miravelu ||

Ovee 129

तरी ह्या द्वंद्वसुखाची कहाणी । पेटेल महावडवानळ वन्ही । राजवैभव हें अब्धिपाणी । भस्म करील निश्चयें ॥

Transliteration

Taree hyaa dvandva-sukhaachee kahaanee | Petela mahaa-vadavaanala vanhee | Raaja-vaibhava hey abdhi-paanee | Bhasma kareela nishchaye ||

Ovee 130

ऐसा विचार करुनि मानसीं । लुमावंती प्रवेशे स्वसदनासी । येरीकडे मैनावतीसी । उत्तर देत नरेंद्र ॥

Transliteration

Aisaa vichaara karuni maanasee | Lumaa-vantee praveshe svasadanaasee | Yereekade Mainaavateesee | Uttara deta narendru ||

Ovee 131

म्हणे माय वो तव कामनीं । ऐसेंचि आहे वेधक मनीं । तंव त्या स्वामीची करणी । निजदृष्टीं पाहीन वो ॥

Transliteration

Mhane maaya vo tava kaamanee | Aisenchi aahe vedhaka manee | Tava tyaa svaameechee karanee | Nija-drishtee paaheena vo ||

Ovee 132

माझें मजलागीं हित । तें द्यावया असेल सामर्थ्य । शोध शोधितां भक्तिपंथ । सहज दृष्टीं पडेल वो ॥

Transliteration

Maajhe majalaagee hitu | Tey dyaavayaa asela saamarthyu | Shodha shodhitaa bhakti-panthu | Sahaja drishtee padela vo ||

Ovee 133

मग मी सोडूनि सकळांस । तनधनमन ओपीन त्यास । तूं येथून वाईट चित्तास । सहसा न मानीं जननीये ॥

Transliteration

Maga mee soduni sakalaansu | Tanadhanamana opeena tyaasu | Too yethuna vaaeta chittaasu | Sahasaa na maanee jananeeye ||

Ovee 134

ऐसें वदोनि समाधानीं । नृप गेला स्नानालागोनी । येरी कडे अंतःपुरसदनीं । काय करी लुमावंती ॥

Transliteration

Aise vadoni samaadhaanee | Nripa gelaa snaanaalaagonee | Yeree kade antahpura-sadanee | Kaaya karee Lumaavantee ||

Ovee 135

परम आवडत्या स्त्रिया पांचसात । तयांच्या आज्ञेंत नृपनाथ । पट्टराणिया प्रीतीवंत । सदा सर्वदा वर्तती ॥

Transliteration

Parama aavadatyaa striyaa paanchasaatu | Tayaanchyaa aajnyenta nripa-Naathu | Patta-raaniyaa preetee-vantu | Sadaa sarvadaa vartatee ||

Ovee 136

तयांसी पाठवूनि परिचारिका । बोलाविल्या सद्विवेका । त्यांत लुमावंती मुख्य नायिका । पट्टराणी रायाची ॥

Transliteration

Tayaansee paathavuni parichaarikaa | Bolaavilyaa sadvivekaa | Tyaata Lumaavantee mukhya naayikaa | Pattaraanee raayaachee ||

Ovee 137

वेगें मांडुनि कनकासन । बैसविल्या प्रीतींकरुन । तांबुलादि पुढें ठेवून । वृत्तांत सांगे रायाचा ॥

Transliteration

Vege maanduni kanaka-aasanu | Baisavilyaa preetee-karunu | Taambulaadi pudhe thevunu | Vrittaanta saange raayaachaa ||

Ovee 138

बाई वो बाई विपरीत करणी । मैनावती राजजननी । विक्षेप पेटला तियेचे मनीं । काय सांगूं तुम्हांतें ॥

Transliteration

Baaee vo baaee vipareeta karanee | Mainaavatee raaja-jananee | Vikshepa petalaa tiyeche manee | Kaaya saangoo tumhaante ||

Ovee 139

कोण गावांत आला हेला । जालिंदर ऐसें म्हणती त्याला । त्याचा अनुग्रह देऊनियां रायाला । जोग देऊं म्हणतसे ॥

Transliteration

Kona gaavaanta aalaa helaa | Jaalindara aise mhanatee tyaalaa | Tyaachaa anugraha deuniyaa raayaalaa | Joga deoo mhanatase ||

Ovee 140

ऐसें वैर भोगवी माता सुत । निश्चय करुनि केला घटपटीत । रायासी बोधितां श्रवणीं मात । सकळ झाली वो बाई ॥

Transliteration

Aise vaira bhogavee maataa sutu | Nishchaya karuni kelaa ghata-pateeta | Raayaasee bodhitaa shravanee maatu | Sakala jhaalee vo baaee ||

Ovee 141

मग राजवैभव सकळ नासलें । स्तंभ भंगल्या सदन पडिलें । मुळींचि अर्कालागीं गिळिलें । मग अंधकार सर्वस्वीं ॥

Transliteration

Maga raaja-vaibhava sakala naasale | Stambha bhangalyaa sadana padile | Muleenchi Arkaalaagee gilile | Maga andhakaara sarvasvee ||

Ovee 142

मग आपण अष्टविंशती सती । असूनि काय करावी माती । परचक्र येऊनि सकळ संपत्ति । विनाशातें पावे हो ॥

Transliteration

Maga aapana ashta-vinshatee satee | Asuni kaaya karaavee maatee | Parachakra yeuni sakala sampatti | Vinaashaate paave ho ||

Ovee 143

परी येउते अर्थाअर्थी । कैसी करावी ती युक्ती । सांगावी आधीं योजूनि सकळ सबळ मतीं । केलिया कारण मोडावे ॥

Transliteration

Paree yeute arthaa-arthee | Kaisee karaavee tee yuktee | Saangaavee aadhee yojuni sakala matee | Keliyaa kaarana modaave ||

Ovee 144

अगे वन्ही म्हणूं नये लहान । तो क्षणें जाळील सकळ सदन । तरी त्यातें करुनि सिंचन । विझवूनियां टाकावा ॥

Transliteration

Aghe vanhee mhanoo naye lahaanu | Toh kshane jaaleela sakala sadanu | Taree tyaate karuni sinchanu | Vijhavuniyaa taakaavaa ||

Ovee 145

उशा घातला विखार । मग सुखनिद्रा केवीं येणार । विष भेदूनि गेल्या जठर । जीवित्व काय वांचेल ॥

Transliteration

Ushaa ghaatalaa vikhaaru | Maga sukha-nidraa kevee yenaaru | Visha bheduni gelyaa jatharu | Jeevitva kaaya vaanchelu ||

Ovee 146

तरी प्रथमचि सारासार । करुनि मोडावा सकळ प्रकार । ऐसी बुद्धि रचूनि सार । सुखसंपत्ति भोगा कीं ॥

Transliteration

Taree prathamachi saaraasaaru | Karuni modaavaa sakala prakaaru | Aisee buddhi rachuni saaru | Sukhasampatti bhogaa kee ||

Ovee 147

ऐसी ऐकूनि तियेची उक्ती । मग तर्कवितर्क करिती त्या युवती । नानाबुद्धि विलाप दाविती । परी निश्चय न घडे कोणाचा ॥

Transliteration

Aisee aikuni tiyechee uktee | Maga tarka-vitarka karitee tyaa yuvatee | Naanaa-buddhi vilaapa daavitee | Paree nishchaya na ghade konaachaa ||

Ovee 148

यापरी विशाळबुद्धी युवती । विचार काढी लुमावंती । की येअर्थी दिसे एक मजप्रती । सुढाळपणीं नेटका ॥

Transliteration

Yaaparee vishaala-buddhee yuvatee | Vichaara kaadhee Lumaavantee | Kee ye arthee dise eka majapratee | Sudhaalapanee netakaa ||

Ovee 149

आपुल्या गावांत जालिंदर । जोगी आहे वैराग्यपर । तरी तयाचा अपाय करुनि थोर । निर्दाळावा सर्वस्वीं ॥

Transliteration

Aapulyaa gaavaanta Jaalindaru | Jogee aahe vairaagyaparu | Taree tayaachaa apaaya karuni thoru | Nirdaalaavaa sarvasvee ||

Ovee 150

निर्दाळावा तरी कैसे रीतीं । तयाच्या भक्तीसी मैनावती । आहे तरी राजयाप्रती । निवेदावें कुडे भावें ॥

Transliteration

Nirdaalaavaa taree kaise reetee | Tayaachyaa bhakteesee Mainaavatee | Aahe taree raajayaapratee | Nivedaave kude bhaave ||

Ovee 151

तरी तो तुमचा वसवसा । ग्रीवे मिरवितसे भयार्थ फांसा । म्हणूनि युक्ति रचिली मानसा । गाढपणीं ऐकावी कीं ॥

Transliteration

Taree toh tumachaa vasavasaa | Greeve miravitase bhaya-artha phaansaa | Mhanuni yukti rachilee maanasaa | Gaadhapanee aikaavee kee ||

Ovee 152

निवेदावें तरी कैसें । काम न आवरे मैनावतीस । म्हणूनि चित्तीं उदास । जालिंदर भोगितसे ॥

Transliteration

Nivedaave taree kaise | Kaama na aavare Mainaavateesu | Mhanuni chittee udaasu | Jaalindara bhogitase ||

Ovee 153

जालिंदराचा अनुग्रह देऊन । जोगी करावा राजियाकारण । मग करुनि पाठवावा तीर्थाटन । अथवा तपाचे कारणीं ॥

Transliteration

Jaalindaraachaa anugraha deunu | Jogee karaavaa raajiyaa-kaaranu | Maga karuni paathavaavaa teertha-atanu | Athavaa tapaache kaaranee ||

Ovee 154

मग तो गेलिया दूर देशीं । गृहीं आणूनि जालिंदरासी । बैसवोनि राज्यासनासी । सकळ सुख भोगावें ॥

Transliteration

Maga toh geliyaa doora deshee | Grihee anuni Jaalindaraasee | Baisavoni raajya-aasanaasee | Sakala sukha bhogaave ||

Ovee 155

ऐसें सांगूनि सकळ रायातें । उदय करावा कोपानळातें । मग सहजविधि जालिंदरनाथ । भस्म होईल त्यामाजी ॥

Transliteration

Aise sanguni sakala raayaate | Udaya karaavaa kopa-analaate | Maga sahajavidhi Jaalindara-Naathu | Bhasma hoeela tyaa-maajee ||

Ovee 156

जैसे विषय अति गोड । गोडचि म्हणूनि करावा पुड । मग तें मिरवे शत्रुचाड । द्वंद्वसुख वाटावया ॥

Transliteration

Jaise vishaya ati godu | Godachi mhanuni karaavaa pudu | Maga tey mirave shatru-chaadu | Dvandva-sukha vaataavayaa ||

Ovee 157

ऐसा विचार करुनी गोमटा । जात्या झाल्या त्या वरवंटा । येरी सांगे राजपटा । गोपीचंद मिरवला ॥

Transliteration

Aisaa vichaara karunee gomataa | Jaatyaa jhaalyaa tyaa vara-vantaa | Yeree saange raajapataa | Gopeechanda miravalaa ||

Ovee 158

राजकारणीं अपार वार्ता । रागरंग कुशळता । मानरंजनीं नृपनाथा । दिवस लोटूनि पैं गेला ॥

Transliteration

Raaja-kaa-ranee apaara vaartaa | Raaga-ranga kushalataa | Maana-ranjanee nripanaathaa | Divasa lotuni pai gelaa ||

Ovee 159

मग निशाउदय तममांडणी । तेही प्रहर गेली यामिनी । मग पाकशाळेंत भोजन करुनी । अंतःपुरीं संचरला ॥

Transliteration

Maga nishaaudaya tama-maandanee | Tehee prahara gelee yaaminee | Maga paakashaalenta bhojana karunee | Antahpuree sancharalaa ||

Ovee 160

संचरला परी लुमावंती । तिच्याचि गेला सदनाप्रती । तिने पाहुनी राजाधिपती । कनकासनी बैसविला ॥

Transliteration

Sancharalaa paree Lumaavantee | Tichyaachi gelaa sadanaa-pratee | Tine paahunee raajaadhipatee | Kanaka-aasanee baisavilaa ||

Ovee 161

उचलोनि परमभक्तीं मांदार । बैसला आहे मंचकावर । गौरवूनि षोडशोपचार । प्रेमडोहीं बुडविला ॥

Transliteration

Uchaloni parama-bhaktee maandaaru | Baisalaa aahe manchakaa-varu | Gauravuni shodasha-upachaaru | Prema-dohee budavilaa ||

Ovee 162

मग तो राव होऊनि निर्भर । रतिसुखाचा करुनि आदर । यावरी गजगामिनी जोडूनि कर । बोलती झाली रायातें ॥

Transliteration

Maga toh raava houni nirbharu | Rati-sukhaachaa karuni aadaru | Yavaree gajagaaminee joduni karu | Bolatee jhaalee raayaate ||

Ovee 163

हे महाराज प्रतापतरणीं । एक वार्ता ऐकली कानीं । परी वदतां भय कीं मनीं । संचरत आहे महाराजा ॥

Transliteration

Hey Mahaaraaja prataapa-taranee | Eka vaartaa aikalee kaanee | Paree vadataa bhaya kee manee | Sancharata aahe Mahaaraajaa ||

Ovee 164

जरी न बोलावें ठेवूनी गुप्त । तरी महाअनर्थाचा पर्वत दिसत । वदूं तंव तरी भयांत । चित्त गुंडाळा घेतसे ॥

Transliteration

Jaree na bolaave thevunee guptu | Taree mahaa-anarthaachaa parvata disatu | Vadoo tava taree bhayaantu | Chitta gundaalaa ghetase ||

Ovee 165

ऐसा उभय पाहतां अर्थ । भ्रांतीमाजीं पडलें चित्त । तरी सुख सुखशब्दाचा सरुनि वात । वार्ता अवघड महाराजा ॥

Transliteration

Aisaa ubhaya paahataa arthu | Bhranteemaajee padale chittu | Taree sukha sukhashabdaachaa saruni vaatu | Vaartaa avaghada Mahaaraajaa ||

Ovee 166

ऐसें ऐकूनि राव बोलत । म्हणे सकळ सोडूनि भयातें । निर्विकार कवण अर्थ । असेल तैसें कळविजे ॥

Transliteration

Aise aikuni raava bolatu | Mhane sakala soduni bhayaate | Nirvikaara kavana arthu | Asela taise kalavije ||

Ovee 167

येरी म्हणे द्याल भाष्य । तरी चित्त सोडील भयदरीस । मग खरें खोटें बरें रत्नास । तुम्हांलागीं अर्पिन तें ॥

Transliteration

Yeree mhane dyaala bhaashyu | Taree chitta sodeela bhaya-dareesu | Maga khare khote bare ratnaasu | Tumhaa-laagee arpina tey ||

Ovee 168

ऐसें वचन नृप ऐकतां । मग करतळभाष्य झाला देता । म्हणे मम दर्पभयाची व्यथा । सोडूनि वार्ता बोल कीं ॥

Transliteration

Aise vachana nripa aikataa | Maga karatala-bhaashya jhaalaa detaa | Mhane mama darpa-bhayaachee vyathaa | Soduni vaartaa bola kee ||

Ovee 169

येरी म्हणे जी एक कुडें । मातेनें रचिलें तुम्हांपुढें । जालिंदर योगी विषयपांडें । वश्य केला आहे की ॥

Transliteration

Yeree mhane jee eka kude | Maatene rachile tumhaampudhe | Jaalindara yogee vishaya-paande | Vashya kelaa aahe kee ||

Ovee 170

परी तुमचा भयाचा संदर्प । अंगीं विरला विषयकंदर्प । तेणेंकरुनि बुद्धी कुरुप । तिनें वरिली आहे जी ॥

Transliteration

Paree tumachaa bhayaachaa sandarpu | Angee viralaa vishaya-Kandarpu | Tenekaruni buddhee kurupu | Tine varilee aahe jee ||

Ovee 171

तुम्हांसी अनुग्रह देऊनि त्याचा । वेष द्यावा योगीयाचा । मग तीर्थाटनीं योग तुमचा । बोळवावें तुम्हांते ॥

Transliteration

Tumhaansee anugraha deuni tyaachaa | Vesha dyaavaa yogeeyaachaa | Maga teertha-atanee yoga tumachaa | Bolavaave tumhaante ||

Ovee 172

तुम्ही गेलिया तपाकारण । दूरदेशीं विदेशाकारण । मग जालिंदराप्रती आणून । राज्यासनीं ओपावा ॥

Transliteration

Tumhee geliyaa tapaakaaranu | Dooradeshee videshaa-kaaranu | Maga Jaalindaraapratee anunu | Raajya-aasanee opaavaa ||

Ovee 173

ऐसें प्रकरणीं सहजस्थिती । श्रुत मात झालें आम्हांप्रती । परी आमुचे सौभाग्यनीतीं । भाग्यार्क दिव्य जाहले ॥

Transliteration

Aise prakaranee sahaja-sthitee | Shruta maata jhaale aamhaampratee | Paree aamuche saubhaagya-neetee | Bhaagya-Arka divya jaahale ||

Ovee 174

आमचें कुंकुम होतें अचळ । म्हणोनि दृष्टीं आले ऐसे फळ । यापरी तुम्हा नृपाळ । वाईट बरें विलोका ॥

Transliteration

Aamache kunkuma hote achalu | Mhanoni drishtee aale aise phalu | Yaaparee tumhaa nripaalu | Vaaeta bare vilokaa ||

Ovee 175

ऐसी ऐकोनि तियेची वार्ता । उचंबळला क्रोधानळाच्या माथां । मग अनर्थानळाच्या शाखा दावितां । भयंकररुपी जाहलासे ॥

Transliteration

Aisee aikoni tiyechee vaartaa | Uchambalalaa krodha-analaachyaa maathaa | Maga anartha-analaachyaa shaakhaa daavitaa | Bhayankara-rupee jaahalaase ||

Ovee 176

मग तो क्रोध न वदवे वाणी । प्रत्यक्ष आला वडवानळ अग्नी । नाथ जालिंदर समुद्रपाणी । प्राशावया क्षोभला ॥

Transliteration

Maga toh krodha na vadave vaanee | Pratyaksha aalaa vadavaanala agnee | Naatha Jaalindara samudra-paanee | Praashaavayaa kshobhalaa ||

Ovee 177

मग तो उठोनि तैसेचि गतीं । बाहेर जाय तो नृपती । मंत्री बोलावूनि सेवकांहातीं । जालिंदरा पाहों चला ॥

Transliteration

Maga toh uthoni taisechi gatee | Baahera jaaya toh nripatee | Mantree bolaavuni sevakaan-haatee | Jaalindara paaho chalaa ||

Ovee 178

शीघ्र आणोनि कामाठयांसी । गर्ती योजिली कूपासरसी । नाथ जालिंदर ते उद्देशीं । तयामाजी लोटिला ॥

Transliteration

Sheeghra aanoni kaamaathyaansee | Gartee yojilee koopaa-sarasee | Naatha Jaalindara tey uddeshee | Tayaa-maajee lotilaa ||

Ovee 179

अश्वलीद न गणती । तेथें सर्वत्र पडली होती । ती लोटूनि गर्तेवरती । नाथजती बुजविला ॥

Transliteration

Ashvaleeda na ganatee | Tethe sarvatra padalee hotee | Tee lotuni garte-varatee | Naatha-jatee bujavilaa ||

Ovee 180

ऐसें गुप्त करोनि प्रकरण । राव सेवी आपुलें स्थान । परी सेवकां ठेविलें सांगोन । मात बोलूं नका ही ॥

Transliteration

Aise gupta karoni prakaranu | Raava sevee aapule sthaanu | Paree sevakaa thevile saangonu | Maata boloo nakaa hee ||

Ovee 181

जरी होतां मुखलंपट । मम श्रोत्रीं आलिया नीट । त्याचें करीन सपाट । यमलोकीं मिरवीन कीं ॥

Transliteration

Jaree hotaa mukha-lampatu | Mama shrotree aaliyaa neetu | Tyaache kareena sapaatu | Yama-lokee miraveena kee ||

Ovee 182

ऐसी ऐकूनि भयंकर वार्ता । दर्पसिंह तो योजूनि माथां । रागेला परी सेवकचित्ता । धुसधुसी मिरवीतसे ॥

Transliteration

Aisee aikuni bhayankara vaartaa | Darpa-sinha toh yojuni maathaa | Raagelaa paree sevaka-chittaa | Dhusadhusee miraveetase ||

Ovee 183

इतुके प्रकरणीं मध्ययामिनी । झाली म्हणूनि नेणती जनीं । अर्कोदयीं पाहिला स्वामी । म्हणती उठोनि गेला असे ॥

Transliteration

Ituke prakaranee madhya-yaaminee | Jhaalee mhanuni nenatee janee | Arkodayee paahilaa svaamee | Mhanatee uthoni gelaa ase ||

Ovee 184

एक म्हणती त्याचें येथें काय । स्वइच्छे बसावें वाटेल तेथ । हा ग्राम नव्हे आणिक राय । ग्रामवस्तीं विराजला ॥

Transliteration

Eka mhanatee tyaache yethe kaayu | Svaichche basaave vaatela tethu | Haa graama navhe aanika raayu | Graama-vastee viraajalaa ||

Ovee 185

ऐशी बहुतांची बहुत वाणी । प्रविष्ट झाली जगालागोनी । कीं जालिंदर गेला येथूनी । महीं भ्रमण करावया ॥

Transliteration

Aishee bahutaanchee bahuta vaanee | Pravishta jhaalee jagaalaagonee | Kee Jaalindara gelaa yethuunee | Mahee bhramana karaavayaa ||

Ovee 186

ऐसी वार्ता नगरलोकीं । उठली ऐकूनि परिचारिकी । त्या जाऊनि सद्विवेकी । मैनावतीसी सांगती ॥

Transliteration

Aisee vaartaa nagara-lokee | Uthalee aikuni parichaarikee | Tyaa jauni sadvivekee | Mainaavateesee saangatee ||

Ovee 187

कीं महाराज आपला गुरु । वस्तुफळाचा कल्पतरु । उठोनि गेला कोठें दुरु । महीं भ्रमण करावया ॥

Transliteration

Kee Mahaaraaja aapalaa guru | Vastu-phalaachaa Kalpataru | Uthoni gelaa kothe duru | Mahee bhramana karaavayaa ||

Ovee 188

ऐसें ऐकोनि मैनावती । असंतोषली परम चित्तीं । म्हणे मम सुताचे दैवाप्रती । लाभ नाहीं आतुडला ॥

Transliteration

Aise aikoni Mainaavatee | Asantoshalee parama chittee | Mhane mama sutaache daivaapratee | Laabha naahee aatudalaa ||

Ovee 189

ऐसें म्हणोनि संकोचित । नेत्रीं प्रेमाश्रु ढाळीत । येरीकडे जालिंदरनाथ । कैसे स्थितीं राहिला ॥

Transliteration

Aise mhanoni sankochitu | Netree prema-ashru dhaaleetu | Yereekade Jaalindara-Naathu | Kaise sthitee raahilaa ||

Ovee 190

तरी अवश्य भविष्य जाणणार । आणि मैनावतीचा लोभ अपार । आणि शत्रुमित्र पाहणार । एकरुपीं समत्वें ॥

Transliteration

Taree avashya bhavishya jaananaaru | Aani Mainaavateechaa lobha apaaru | Aani shatru-Mitra paahanaaru | Ekarupee samatve ||

Ovee 191

नातरी परम प्रतापी वासरमणी । क्षणें टाकील ब्रह्मांड जाळोनि । तो भद्र ज्याची विपर्यासकरणी । तुष्ट कैसा राहिला ॥

Transliteration

Naataree parama prataapee vaasara-manee | Kshane taakeela Brahmaanda jaaloni | Toh bhadra jyaachee viparyaasa-karanee | Tushta kaisaa raahilaa ||

Ovee 192

जो द्वंद्वातीत मूर्तिमंत । दंभरहित स्वरुपीं मिरवत । ममता निःसंग विरहित । कार्याकार्य जाणोनी ॥

Transliteration

Jo dvandva-ateeta moorti-manta | Dambha-rahita svarupee miravatu | Mamataa nihsanga virahitu | Kaarya-akaarya jaanonee ||

Ovee 193

असो गर्तेमाजी यतिनाथ । वज्रासनातें घालोनि खालतें । आकाशास्त्र प्रेरुनि भोंवतें । स्वस्थचित्तीं बैसला ॥

Transliteration

Aso gartemaajee yati-Naathu | Vajra-aasanaate ghaaloni khaalate | Aakaasha-astra preruni bhovate | Svastha-chittee baisalaa ||

Ovee 194

आकाशास्त्र असतां भोंवतें । लीद मिरवे सभोंवतें । यापरी आकाशास्त्र माथां । वज्रास्त्र स्थापिलें ॥

Transliteration

Aakaasha-astra asataa bhovate | Leeda mirave sabhovate | Yaaparee aakaasha-astra maathaa | Vajra-astra sthaapile ||

Ovee 195

तेणेंकरोनि अधरस्थळीं । लीद मिरविली आहे शिरीं । येरीकडे अंतःपुरीं । जनवार्ता समजली ॥

Transliteration

Tenenkaroni adhara-sthalee | Leeda miravilee aahe shiree | Yereekade antahpuree | Jana-vaartaa samajalee ||

Ovee 196

नाथ जालिंदर गेला निघोन । मग सकळ स्त्रियांचे झालें समाधान । बरें झालें म्हणती निधान । येऊनि पहुडल्या सेजेसी ॥

Transliteration

Naatha Jaalindara gelaa nighonu | Maga sakala striyaanche jhaale samaadhaanu | Bare jhaale mhanatee nidhaanu | Yeuni pahudalyaa sejesee ||

Ovee 197

यापरी पुढें सुरस । धुंडीसुत सांगेल श्रोतुयांस । तरी सर्व श्रोतीं टाकूनि आळस । अवधान द्यावें पुढारां ॥

Transliteration

Yaaparee pudhe surasu | Dhundee-suta saangela shrotuyaansu | Taree sarva shrotee taakuni aalasu | Avadhaana dyaave pudhaaraa ||

Ovee 198

मालू धुंडी नरहरि वंशीं । कथा वदेल नवरसी । परी वारंवार श्रोत्यांसीं । कृपा अवधान मागतसे ॥

Transliteration

Maaloo dhundee Narahari-vamshee | Kathaa vadela navarasee | Paree vaaramvaara shrotyaansee | Kripaa avadhaana maagatase ||

Ovee 199

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । चतुर्दशाध्याय गोड हा ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha-Kaavya Kimayaagaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Chaturdasha Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu

Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार चतुर्दशाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Chaturdasha Adhyaya Samapth